''ग्रामीण भागतील मुस्लीम महिलांच्या सामाजिक व शैक्षणीक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यासः विशेष संदर्भ परभणी जिल्हा.''

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवी करीता सादर केलेल्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

असमा नौशीन अमीन अहेमद

मार्गदर्शक

डॉ.अंसारी शफिका परवीन गफार

सहयोगी प्राध्यापक

पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

जि. लातूर

2023

‘‘ग्रामीण भागतील मुस्लीम महिलांच्या सामाजिक व शैक्षणीक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ परभणी जिल्हा.’’

प्रस्तावनाः

भारतीय समाजसंरचनेत ग्रामीण समुदायाची बहुलता दिसुन येते सन २००१ च्या जनगणनेनुसार ७४.३ टक्के लोकसंख्या ग्रामीण समुदायात केंद्रीत झाली आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ६० टक्के उत्पन्न शेती व त्या संबंधीत व्यवसायातून मिळते. ६५ ते ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. महात्मा गांधी, के.एम. पणीकर या बरोबर इतर समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण समुदायाच्या प्रचलनास अधोरेखित केले आहे. क्रोपोहक्कीन हा विचारवंत म्हणतो, ‘‘जगात असा कोणताही वंश नाही ज्याची सुरवात ग्राम समुदायाने झालेली नाही.’’ ग्रामीण समुदाय कृषिप्रधान असुन गृहउद्योगाशी निगडित आहे. भारतीय समाज जीवनातील मुलभूत व अतिप्राचीन ग्राम समुदाय खेडे किंवा गाव म्हणुन ओळखला जातो. खेडे भारतीय भारतीय समाज जीवनाचा गाभा असुन त्याची परंपरा, अतिप्राचीन आहे. त्रि.ना.आत्रे यांनी ‘गावगाडा’ या ग्रंथात गावाची व्याख्या दिली आहे त्यांच्या मते, ‘‘ज्या समुदायाच्या सभोवताली काळी कसदार जमीन असुन ज्यात शेतकरी व अन्य गृह व्यवसाय करणारे लोक राहतात त्यास ग्राम म्हणावे.’’ अशा ग्रामीण समुदायात वास्तव्यास असणाऱ्या समाजास ग्रामीण समाज म्हणतात. अशा या ग्रामीण समुदायात मुस्लीम महिलाच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

मुस्लिम शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभुमी :

इस्लाम धर्मास मानणाऱ्या अनुयायास मुस्लीम म्हटले जाते. मुस्लिम धर्माच्या अभ्यासासाठी आपण इतिहासाच्या पानांवर पाहातो तेव्हा आपल्या लक्षात येते की शिक्षणसंस्थाना धर्माच्या शिक्षणाचा मुख्य केंद्र (१) मकतब (२) मदरसे (३) सुफी संतांच्या खानकाह होता. मकतब येथे कुटंबातील मुले व त्या परिसरातली मुले प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी सभेला येत असत. या बैठकीला मकतब असे म्हणतात. ज्यांची मुले तिथे शिक्षण घेण्यासाठी यायची व त्यांना आर्थिक मदत करायची. शिक्षणाचे दुसरे

महत्वाचे केंद्र म्हणजे मदरसा जिथे उच्च शिक्षण दिले जात असे राज्याने स्थापन केलेल्या मदरसांना राज्याकडून आर्थिक मदत मिळत होती. मुस्लीम शिक्षणाचे तिसरे महत्वाचे केंद्र सुफी संताचा खानकाह होता अजमेर मधील शेख मुईनुद्दीन चिश्तीचा खानकाह दिल्लीतील शेख निजामुद्दीन औलियाचा खानकाह सिध्दी मौलाचा खानकाह ही विधिची प्रसिध्द केंद्र होती. दिल्लीत आणि त्यांच्या जवळ सुफी संतांच्या सुमारे २००० खानकाह होत्या जिथे देश–विदेशाची विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत. मध्ययुगीन काळात मुस्लिम समाजातील शिक्षणतज्ञ धार्मिक व्यक्ती विचारवंत यांचे लक्ष शिक्षणाकडे गेले कारण अरबी भोषेचे ज्ञान घेतल्याशिवाय सामान्य मुस्लिम कुराण वाचु शकत नव्हते. शासनाचे नियम समजु शकत नव्हते या काळात इस्लामी शिक्षणाचा सर्वांगीण विकास झाला. धर्म हा शिक्षणाचा मुख्य आधार होता. भारतात तुर्कि मुस्लिमांच्या आगमना बरोबर मदरसाचे ही आगमन झाले म्हणजेच तुर्कीचे आगमन मदरसा शिक्षणाचे आगमन म्हणुन आपण पाहु शकतो. असे म्हटले जाते की महम्मद बिन कासिमने आपल्या काही अरब विदवानांसह मदरसे स्थापन केले. विद्यमान पुराव्यानुसार मदरसा अजमेर येथे ११९१ मध्ये स्थापित झाला जेव्हा मुहम्मद घौरीने अजमेर जिंकला सुरूवातीला मदरसात कोणतेही अभ्यासक्रम नव्हते, उलट ते त्याच्या आवडीचे पुस्तक निवडण्यास मोकळे होते. मुस्लिम, सरदार, आणि राज्यकर्त्यांना देशाच्या विविध भागात अनेक मदरसे स्थापन केले. एकटया दिल्लीत हजारो मदरसे होते. त्यापैकी बहुतेक शाफीचे आणि बाकीचे हनफीचे होते.

मुगलकाळात मुस्लिम शिक्षण :

सुलतानी कालखंडाप्रमाणेच मुगल काळातील मुस्लिम शिक्षणाचा मुख्य उद्देश आत्माचे शुध्दीकरण, संतुलित आचरण, चांगले वर्तन आणि मनुष्याच्या सर्व गुणांचा विकास करणे हा होता. शिक्षण तत्वज्ञानाच्या मते धार्मिक आणि नैतिक शिक्षण देऊनच ही उदि्ष्टे साध्य होऊ शकतात. पुर्वी प्रमाणेच मुगल काळात ही प्राथमिक शिक्षण मशिदिंशी संलग्न असलेल्या किंवा खाजगी व्यक्तीच्या घरात स्थापन केलेल्या मकतबांमध्ये दिले जात असे. त्यानंतर उच्च शिक्षण विशेषत: इस्लामिक कायदा आणि धर्मशास्त्र हे सुफी संतांच्या खानकाह मध्ये उपलब्ध होते. प्रौढ वयात मुस्लिमांना माध्यमिक किंवा उच्च शिक्षण प्राप्त झाले होते. मशिदिंशी सलग्न मकतब आणि मदरसे श्रीमंत मुस्लिमांच्या मदतीने किंवा मुगल सम्राटांकडून

मुस्लिम सरदारांनी दिलेल्या अनुदान, जमीन किंवा आर्थिक सहाय्याने स्थापन केले गेले होते. जेणेकरून मुस्लिमांना तिथे शिक्षण घेता येईल त्या परिसरातील मुला—मुलींना शिक्षण दिले जात होते.

ब्रिटीश काळात मुस्लिम शिक्षण :

१८ व्या शतकापूर्वी भारतीय राज्यकर्त्यांनी केवळ धार्मिक आधारावर उच्च शैक्षणिक संस्थांना काही आर्थिक साहय दिले. ब्रिटीश काळात औपचारिक संस्था म्हणजेच शाळा स्थापन करण्यात आल्या. ज्या मध्ये केवळ सरकारी कर्मचारी, व्यापारी, सावकार, जमीनदार हे लोक हिशोब यावा यासाठी शिक्षण घेत होते. त्यांनीच प्राथमिक शिक्षण घेतले मुस्लिमांच्या शिक्षणासाठी मदरसे होती मशिदिंमध्ये शाळेत चालविल्या जात होत्या स्त्रियां शिक्षण घेण्यासाठी शाळेत, मशिदिंमध्ये जात नव्हत्या.१८५४—१९०२ या कालावधीत सर चार्ल्स वुडचा जाहीरनामा १८५४ हंटर शिक्षा आयोग स्थापन करण्यात आले. ग्रामीण भागात व्यवसायिक शिक्षणावर भर देणे आधिक योग्य मानले. सैडलर कमिशनने मुस्लिमांना शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या मागासलेपणावर मात करण्यासाठी आणि त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी उपाय सुचवले हिंदु आणि मुस्लिम दोन्ही वर्गातील मुलींच्या शिक्षणासाठी पडदा शाळा स्थापन करण्याची सुचना केली परिणामी १९२० मध्ये अलीगड मुस्लिम विद्यापीठाची स्थापना झाली.

स्वतंत्र भारतात मुस्लिम शिक्षण :

स्वतंत्र्यप्राप्तीनंतर मुस्लिमांच्या हितसंबंधी व आवश्यक तरतुदी संविधानात करण्यात आल्या आहेत. स्वतंत्र भारताचे प्रथम राष्ट्रीय शैक्षणिक धारेण १९६८ मध्ये १७ कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला होता त्यात एक कार्यक्रम ‘‘अल्पसंख्याकांच्या शिक्षणाची व्यवस्था’’ देखील होता. १८७९ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धारेणात ही अल्पसंख्याकांच्या शिक्षणासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात यावी असे म्हटले होते. या समुदायांना त्यांच्या शाळा उघडण्याची परवानगी देण्यात यावी असे सुचवले. आधुनिक काळात मुस्लिम समुदायामध्ये मदरसा व्यतिरिक्त शाळा महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. शासनाने १९९२ मध्ये मागासलेल्या जातींना आरक्षण दिले त्यात अधिकतर मुस्लीम जातीचा समावेश होतो. या जातीत शैक्षणिक

मागासलेपण अधिक आहे. त्यातच मुस्लीम महिलांची शैक्षणिक स्थिती अधिक निम्न आहे. या दृष्टीने विचार करता या विषयाचे सखोल अध्ययन व्हावे यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संकल्पना :

ग्रामीण समुदाय :

ग्रामीण समुदाय लोकांच्या अशा समुदायाला म्हणता येईल की, जो एका भौगालिक क्षेत्रात कायमच राहत असतो. आणि त्याच्या सभासदामध्ये सामुहिक जीवन, सामाजिक, आर्थिक संबंध अशा रितीने विकसीत झालेले असतात की जे इतर समुदायापेक्षा वेगळे असतात. अशाना ग्रामीण समुदाय म्हणतात.

शिक्षण :

शिक्षण समाजजीवनातील अखंड प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वागीण विकास होतो. शिक्षण म्हणजे ज्या समाजामध्ये समाजाच्या सदस्यांना वर्तणूकीवर ज्या प्रक्रियाव्दारे जाणीवपुर्वक नियंत्रण केले जाते की ज्यामुळे व्यक्ती व व्यक्तीव्दारे समूह जीवनातील वर्तनामध्ये बदल घडून येतात त्याला शिक्षण म्हटले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीच्या शरीराचा मनाचा व आत्म्याचा विकास होतो.

संशोधन विषयाची निवड :

भारतीय ग्रामीण समाजामध्ये शिक्षणाची स्थिती दयनिय आहे. प्रामुख्याने ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती ही अधिक दयनीय असल्याचे दिसते या पार्श्वभुमीवर परभणी जिल्यातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती जाणून घेण्याची उत्सुकता झाली व या उत्सुकतेपोटी ग्रामीण समाजाची संरचना, कार्य, घटकांचा शिक्षण या संकल्पनेशी सहसंबंध काय आहे हे जाणून घेताना परभणी जिल्हयातील मुस्लिम महिलांची कौटुंबिक स्थिती, आर्थिक स्थिती, धार्मिक स्थिती, सामाजिक स्थिती कशी आहे. त्यांचे प्रश्न त्यांच्या समस्या काय आहेत. शैक्षणिक स्थितीच प्रमाण कसे आहे. त्याचा विचार होणे आवश्यक आहे हा चिंतनाचा व संशोधनाचा विषय आहे या समस्येच्या निराकरणासठी यावर तपशीला जाऊन अध्ययन व कारणांचा शोध घेऊन अभ्यासंती जर काही विधायक सूचना करता आल्या तर योग्यच होईल हाच या संशोधना मागील हेतू आहे. त्यासाठी संशोधन मर्यादित व वस्तुनिष्ठ

होण्यासाठी संशोधन विषय घेण्याचे ठरले. परभणी जिल्हयातील ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा समाजशास्त्री अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला. त्यासाठी संशोधनाच्या दृष्टीकोणातून काही उद्दिष्टे निश्‍चित केले आहे ते पुढील प्रमाणे.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन या बाबत माहिती मिळविणे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांची वैयक्तिक कौटुंबिक आणि आर्थिक पार्श्वभुमी जाणून घेणे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांना शासकीय शैक्षणिक सुविधा मिळतात काय याचे अध्ययन करणे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलाच्या शैक्षणिक मागासलेपणाचे स्वरूप व कारणांसंबंधी माहिती प्राप्त करणे व उपाय सुचवणे.

गृहीतकृत्ये :

प्रस्तुत संशोधन विषयासंबंधीची गृहीतकृत्ये पुढील प्रमाणे आहेत.

- ग्रामीण समाजात मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती निम्न आहे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांमध्ये शिक्षणाच्या बाबत विशेष जागरूकतेचा अभाव आहे.
- ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती दयनीय आहे.
- मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक मागासलेपणास अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी परंपरा मोठया प्रमाणात जबाबदार आहे.
- मुस्लिम महिलांच्या शिक्षणासंबंधी शासन संस्था उदासीन आहे.

संशोधनाचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने बरेचसे लिखान झालेले असले तरी सदरील संशोधनास विषय अनुरूप दुर्लक्षित पैलून वर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. चिंतन व संशोधनाच्या साहयाने अशा स्वरूपाचे संशोधन होणे हे काळाच्या ओघात महत्वाचे आहे. भारतात महिलांची शैक्षणिक स्थिती हे निम्न स्वरूपाची असल्याचे दिसून येते. 'पॉप्युलेशन ॲक्शन' इंटरनॅशनल संस्थेने जगातील ११२ देशांच्या मुलींच्या व महिलांच्या शिक्षणाच्या अवस्थेचा तुलनात्मक अभ्यास केलो. त्यात असे अढळून आले की भारतात महिलांची शैक्षणिक स्थिती निम्न आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात मुस्लिमांचे प्रमाण १३.४ टक्के आहे. म्हणजे १४ कोटी ७५ लाख मुस्लिम आहेत. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आलेली सात सदस्य समिती न्यायमुर्ती राजेंद्र सच्चर समिती म्हणून ओळखली जाते या समितीने मुस्लिम समाजाबद्दल दिलेला अभ्यास पूर्ण अहवाल या मोठया जनसमुदायाचे मागासले पण स्पष्ट करते. मुस्लिमांची साक्षरता ४९.९ टक्के आहे. त्यातच मुस्लिम महिलांचे शिक्षणाचे प्रमाण तर अधिकच कमी असल्याचे दिसते. मुस्लिम समाज हा शैक्षणिक आर्थिक दृष्टया मागासलेला आहे धर्माचा पगडा या लोकांच्या मनावर मोठया प्रमाणात आहे. या समाजातील शैक्षणिक मागासलेपणास कोणते घटक कारणीभूत आहेत हे शोधण्यासाठी हा विषय महत्वाचा ठरतो. ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती बाबत विविध दृष्टीकोनातून वेगवेगळया संशोधकांनी अभ्यास केला असला तरी पूर्व संशोधाच्या सुटलेल्या काही मुद्दयांचा या संशोधमामध्ये समावेश केला जाणार आहे. म्हणून या अभ्यासाला वेगळे महत्व असणार आहे. विशेषत: मराठवाडयातील परभणी जिल्हयातील ग्रामीण भागातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थितीच्या अभ्यासासाठी हे संशोधन दिशादर्शक ठरणार आहे. त्यामुळे या संशोधनाला वेगळे महत्व असणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :

ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थिती चा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्हा. या प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्हयातील ग्रामीण समाज तथ्य संकलनासाठी व संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

- सदरील अध्ययनात मुस्लिम महिलांच्या सामाजिक आर्थिक, शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करण्यात येईल.
- सदरील संशोधन परभणी जिल्हा पुरते सीमित असेल.
- सदरील संशोधन फक्त परभणी जिल्हयातील ग्रामीण भागातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थितीशी निगडित आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग केला आहे. या पध्दतीव्दारे संशोधनात वस्तुनिष्ठता येत असते. ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास या विषयासंबंधी कमबध्द व वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करण्यास तथ्यांचे कमबध्द निरीक्षण वर्गीकरण आणि निर्वाचन केले जाणार आहे.

संशोधनाचा आराखडा :

संशोधनाच्या उद्दिष्टानुसार निदानात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग केला जाणार आहे. एखादया समस्या संबंधीच्या कारणांचे वास्तविक ज्ञान प्राप्त करून त्या समस्येच्या निराकरण्यासाठी उपाययोजना सुचवणे हे निदानात्मक संशोधन करण्याचा उद्देश आहे. ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती ही जागतिक समस्या बनलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील परभणी जिल्हयातील मुस्लिम महिलांची शैक्षणिक स्थिती ही एक समस्या आहे. सदरील संशोधनसाठी निदानात्म संशोधन आराखडयाचा आधार घेऊन मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थिती वर उपाय सुचवले जाणार आहेत.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्य संकलनासाठी गैरसमभाव्यता निवडीतील सहेतूक नमुना निवडीच्या आधारे निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातून २२ उत्तरदात्याची निवड केली जाणार आहे. परभणी जिल्हयातील नऊ तालुक्यातून २०० उत्तरदाते निवडले जातील.

तथ्य संकलनाच्या पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोत या दोन्ही साधनांचा वापर करून माहिती व अकडेवारी संकलित केली जाणार आहे.

- **प्राथमिक स्त्रोत**

प्रस्तुत संशोधन प्रामुख्याने प्राथमिक स्त्रोतावर आधारलेले आहे. परभणी जिल्हयातील ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत अनुसूची निरीक्षण या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

- **व्दितीय स्त्रोत :**

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी सामग्री ही विविध संदर्भ ग्रंथ, वार्षिक अहवाल, ग्रामीण विकास यंत्रणा, अहवाल, आर्थिक व सामाजिक समालोचन, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, संबंधित एमफिल, पीएचडी संशोधन प्रबंध, विविध संकेतस्थळे, मासिके, वर्तमानपत्रे, तैमासिके, इंटरनेट इत्यादी व्दारे संशोधन विषयाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती आकडेवारी संकलित केली जाणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन :

प्रस्तुत संशोधनात उपलब्ध तथ्यांचे प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताच्या आधारे तथ्य संकलित केल्यानंतर त्याचे व्यवस्थित प्रस्तुतीकरण करण्यासाठी वर्गीकरण सारणीकरण करण्यात येणार आहे.

तसेच संकलित केलेल्या माहिती व आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी एम.एस.एक्सेल तसेच एस.पी.एस.एस. प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरण मांडणी :

- **प्रकरण पहिले :**

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात मुस्लिम समाजाचा शैक्षणिक इतिहास, सच्चर कमिटी आयोग रिपोर्ट, ग्रामीण समुदाय, शिक्षण संकल्पना, अल्पसंख्यांक, भारत, महाराष्ट्र, मराठवाडा व परभणीची शैक्षणिक आकडेवारी, परभणी जिल्हयाचा इतिहास यांचा आढावा घेतला जाणार आहे.

- **प्रकरण दुसरे :**

साहित्य सर्वेक्षण आणि संशोधन पध्दती

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात अभ्यासासाठी आवश्य माहिती ज्याव्दारे संकलित केले जाणार आहे व पध्दतीची दिशा ठरवलेली आहे त्याचे ही विवेचन या प्रकरणात करण्यात येणार आहे. संशोधन पध्दती विषयी सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की यामध्ये वैज्ञानिक पध्दती संशोधन आराखडा व दुय्यम साधनांचा समावेश होते.

थोडक्यात हा अभ्यास करताना प्रस्तुत संशोधन कर्त्याने संबधित विषयावरील उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतला जाणार आहे.

- **प्रकरण तिसरे :**

उत्तरदात्याची वैयक्तिक व आर्थिक माहिती

प्रस्तुत प्रकरणात उत्तरदात्याचे वय,जात, धर्म, भाषा, कुटुंबाचा प्रकार वैवाहिक स्थिती, याचे विश्लेषण करण्यात येणार आहे. कौटुंबिक स्थिती, धार्मिक स्थिती, आर्थिक स्थिती या प्रमुख

बाबीचा संकल्पनात्म दृष्टीने मांडणी करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला जाणार आहे. आवश्यक त्या ठिकाणी आलेख सारणी याचा उपयोग करण्यात येणार आहे.

- **प्रकरण चौथे**

मुस्लिम महिलांचा शैक्षणिक दृष्टीकोण

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्हयातील ग्रामीण समाजातील मुस्लिम महिलांचा शैक्षणिक दृष्टीकोन आढावा घेण्यात येणार आहे.

- **प्रकरण पाचवे**

शासनाच्या योजना व ध्येयधोरणे

प्रस्तुत पाचव्या प्रकरणात शिक्षणासंबंधी शासनाने केलेल्या उपाय योजना त्यांची अंमलबजावणी व त्याचा फायदा लोकांना मिळतो का प्राथमिक तथ्याच्या आधारावर माहिती मिळवून विश्लेषण सारणी तयार करण्यात येणार आहे गरज पडेल तसे आलेख वापण्यात येणार आहेत.

- **प्रकरण सहावे**

निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण सहावे हे निष्कर्ष व शिफारशी चे आहे. यात मागील पाच प्रकरणाचा आढावा घेण्यात येणार आहे. अभ्यासांती आलेले निष्कर्ष मांडून काही शिफारशी सुचवल्या जाणर आहेत.

संदर्भ ग्रंथ :

१. देसाई, ए.आर.१९९७. भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, जयपूर आणि दिल्ली : रावत पब्लिकेशन.

२. महाजन, संजीव. २००४. ग्रामीण समाजशास्त्र. दिल्ली : अर्जुन पब्लिकेशिंग हाऊस.

३. आगलावे, प्रदीप. २०१०. सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे. तिसरी आवृत्ती. नागपूर.

४. कऱ्हाडे, बी.एम. २००७. ॠस्त्रीय संशोधन पध्दती. दुसरी आवृत्ती. नागपून : श्री साईनाथ प्रकाशन.

५. दहोडराय, स्वाती आणि तांबे, अनघा (संपा.) भारतातील स्त्रिया : एक ओळख. पुणे : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.

६. सबीहा रहमानी – 'भारतीय मुस्लिम महिला एवं सशक्तीकरण' अध्ययन पब्लिसर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली – २००६

७. इंग्रजी :Sharma Rajendra K- 1997. 'Rural Socilogy', New Delhi : Atlantic Publishers and Distrubutors.

इंटरनेट :

1. www.google.com
2. www.wikipedia.com
3. www.maharashtratimes.com
4. Google.com.searchmalnutrition among tribal's Wikipedia the freeencyclopedia.htm
5. www.mahagov.in
6. www.laturnic.in

संशोधक

आसमा नौशीन अमीन अहेमद

मार्गदर्शक

डॉ.अंसारी शफिका परवीन गफार
सहयोगी प्राध्यापक
पदवी पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर
ता.उदगीर जि. लातूर